Estd 1962
Naac 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ११/९/२०२१

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग तसेच संलग्नित महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१—२२ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठीची पदव्युत्तर प्रवेश परीक्षेचे आयोजन दि.११, १२, १३ व १५ सप्टेंबर २०२१ रोजी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व बेळगाव या जिल्हयातील एकुण ११ परीक्षा केंद्रावर करण्यात आले आहे.

आज दि.११ सप्टेंबर २०२१ रोजी एम.एस्सी. — केमिस्ट्री (इंडस्ट्रीयल/ॲप्लाईड/ इनऑरगॅनिक/ ऑरगॅनिक/फिजिकल/ॲनेलिटीकल), एम.एस्सी. (मायक्रोबॉयोलॉजी/फार्मासिटीकल मायक्रोबॉयॉलॉजी/ इंडस्ट्रियल मायक्रोबॉयॉलॉजी/ॲप्लाईड मायक्रोबॉयॉलॉजी), एम.एस्सी. मॅथॅमेटिक्स, एम.एस्सी, झुलॉजी, एम. एस्सी.—फिजिक्स इ. अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा पार पडल्या. यासाठी आज एकुण ६८२५ विद्यार्थ्यांपैकी ५८८० इतक्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. प्रवेश परीक्षेस उपस्थित राहण्याचे विद्यार्थ्यांचे प्रमाणे हे शेकडा ८६.२४ टक्के इतके होते. सदरची परीक्षा ही तीन सत्रामध्ये सुरळीतपणे पार पडली.

**आज पार पडलेल्या परीक्षेपैकी एम.एस्सी केमिस्ट्री या विषयासाठी ४५५९ विद्यार्थ्यांपैकी ४०१० इतक्या विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.**

काही तांत्रिक कारणास्तव विद्यापीठाच्या परीक्षा न देवू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची पुनर्रपरीक्षा घेण्यासाठी दि.९ सप्टेंबर २०२१ अखेर विद्यार्थ्यांना लिंक उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्यानुसार एकुण ८८४५ विद्यार्थ्यांनी लिंकद्वारे पुनर्रपरीक्षा घेण्याबाबतची माहिती विद्यापीठास कळविली आहे. या विद्यार्थ्यांची पुनर्रपरीक्षा दि.१६ सप्टेंबर २०२१ पासून घेण्याचे विद्यापीठ प्रशासनाने प्रयोजले आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी त्याबाबतची माहिती व सूचना विद्यार्थ्यांना त्वरित समजता याव्यात यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे संकेतस्थळ, स्वत:चा ईमेल तसेच नोंदणीकृत मोबाईल वारंवार पाहून पुढील कार्यवाही करावी तसेच अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु झालेली नाही त्यांनी मॉक टेस्ट सत्वर द्यावी म्हणजे मुख्य परीक्षेत तांत्रिक अडचणी येणार नाहीत असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री. गजानन पळसे यांनी महाविद्यालयास केले.